दै. तरुण भारत दि. १०.०६.२४

# वन्य प्राण्यांची तस्करी करणाऱ्यास अटक; दोन घोरपडी जप्त



**तभा वृतसेवा**
**नांदेड , दि.०९ जून -**

वन्य प्राण्यांची तस्करी करणाऱ्या एकास ग्रामीण पोलीसाच्या पथकाने अटक केली असून त्याच्याकडून पाच किलो वजनाची व तीन किलो वजनाची अशा दोन घोरपडी जप्त केल्या आहेत.

ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरिक्षक ओमकांत चिंचोळकर यांना वन्य प्राण्यांची तस्करी, विक्री होत असल्याची मिळालेल्या गोपनिय माहितीच्या आधारे चंदासिंग कॉर्नर येथे पोलीस गस्त घालत असतांना एक इसम संशयीतरित्या फिरत असल्याचे दिसून आले. त्याचे नांव दशरथ धोतरे रा. काकांडी असे आहे. त्याला हटकवून त्याची अंकझडती घेतली असता त्याच्या जवळ असलेल्या पिशवीत एक पाच किली वजनाची व तीन किलो वजनाची घोरपड आढळून आली. पोलीसांनी सदरच्या व्यक्ती अटक करून त्याच्याकडेल दोन्ही घोरपडी जप्त करून त्या वन्य परिक्षेत्र अधिकाऱ्याकडे सुपूर्द करण्यात आल्या. त्याच्यावर कारवाई करण्यात आली असल्याची ग्रामीण पोलीसांनी सांगीतले.

दुसऱ्या एका कारवाईत ग्रामीण पोलीसांनी सोशल मिडीयावर हत्यारासह फोटो ठेवून दहशत निर्माण करणाऱ्या दोन अल्पवयीन बालकांना तुप्पा येथून अटक केली आहे. त्यांच्याकडून एक लोखंडी तलवार, लोखंडी खंजर असा एकुण २ हजार ५०० रूपयांचा मुदेमाल जप्त केला आहे.

**चोरीचा गुन्हा दोन तासात उघड**

रहिमपूर दुध डेअरीज्वळ एका उघड्या असलेल्या घरातून १ लाख ७१ हजार रूपयांचा ऐवज चोरून नेला आहे. काल सायंकाळी ही घटना घडीली आहे.

शेख मौला शेख मोहम्मद रा. रहिमपूर हे अनावधानाने आपल्या घराला कुलूप न लावता बाहेर गेले. ही संधी साधून चोरट्यांनी त्यांच्या उघड्या धरातून गादीखाली ठेवलेले १४ ग्राम सोन्याचे दागिणे, ७ ग्राम सोन्याचे गंठन आणि मंगळसुत्र असा १ लाख ७१ हजार रूपयांचा ऐवज चोरून लंपास केला. घरी आल्यानंतर शेख मौला यांना हा प्रकार समजला. त्यांनी लगेच ग्रामीण पोलीस ठाणे गाठून रितसर तक्रार नोंदवली. ग्रामीण पोलीसांनी अज्ञात चोरट्याविरूध्द गुन्हा दाखल केला आहे.

# घोरपड तस्कराकडून दोन घोरपड जप्त



## आरोपी ताब्यात

देशोन्नती वृत्तसंकलन

**नांदेड :** घोरपडीची तस्करी करणाऱ्यास नांदेड ग्रामीण पोलिसांनी ९ जून रोजी ताब्यात घेतले असून त्याच्याकडून दोन घोरपडी जप्त केल्या आहेत. पोलिस अधीक्षक अबिनाश कुमार यांनी सर्व प्रकारचे अवैध धंदे, अवैध कृती यांच्यावर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. त्या अनुषंगाने ९ जून रोजी नांदेड ग्रामीण ठाण्याचे पोलिस निरीक्षक ओमकांत चिंचोलकर यांना ९ जून रोजी दुपारी १ वाजताच्या सुमारास एक इसम घोरपड या प्राण्याची तस्करी करुन विक्री करण्यासाठी जवळ बाळगून आहे, अशी माहिती मिळाल्याने त्यांनी वर नमुद पोलीस अंमलदार यांना चंदासिंग कॉर्नर येथे पाठवून छापा कारवाई केली असता तेथे दशरथ यलप्पा धोतरे (२७) हा इसम पिशवी घेवून मिळून आला. त्या इसमाजवळील पिशवीची पाहणी केली असता त्यात एक घोरपड अंदाजे ५ किलो वजनाची व एक घोरपड ३ किलो वजनाची असे तस्करी विक्री करण्याच्या उद्देशाने मिळून आला. पकडलेल्या घोरपडीबाबत वनपरिक्षेत्र अधिकारी नांदेड यांना पुढील कारवाई करण्याचे पत्रक देवुन गुन्हा दाखल करण्याची प्रकिया सुरु आहे. पकडण्यात आलेल्या घोरपडी वनपरिक्षेत्र अधिकारी यांच्याकडे देण्यात आल्या आहेत.

या कारवाई पथकात पो. नि. ओमकांत चिंचोलकर यांच्या मार्गदर्शनाखाली पोहेकॉ वसंत केंद्रे, असिफ, जमीर, कांबळे यांचा समावेश होता.